पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

---

# प्रेसनोट क्र. ४९ दिनांक ०५/०९/२०२२

# पालघर पोलीस दलाकडून "जनसंवाद अभियान" उपक्रमाची सुरुवात

पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून दि.३१/०८/२०२२ पासून पालघर जिल्हा पोलीस दलातील सर्व पोलीस ठाणेत **"जनसंवाद अभियान"** सुरु करण्यात आले आहे. सदर अभियानांर्तगत पोलीस ठाणेत नेमणूकीत असलेल्या प्रत्येक पोलीस अंमलदार प्रत्येकी एका गावचा जनसंपर्क अंमलदार म्हणून कार्यरत राहील व तो गावातील सरपंच, पोलीस पाटील, शांतता मोहल्ला कमिटी सदस्य, महिला दक्षता सदस्य, तंटामुक्त समिती अध्यक्ष, प्रतिष्ठीत नागरीक यांच्या संपर्कात राहून गावातील प्रत्येक सण उत्सव, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, गावातील दैनंदिन घटना, गावातील नागरीकांचे प्रश्न व अडीअडचणी जाणून घेवून त्याबाबतच्या माहितीची देवाणघेवाण करतील. त्याचसोबत नेमण्यात आलेला अंमलदार प्रत्येक गावचा एक वॉटस्अप ग्रुप कार्यान्वीत करेल. सदर ग्रुपमध्ये गावातील सर्व संभाव्य घटनांबाबत तसेच इतर माहितीचे संदेश प्रसारीत करण्यात येतील. गावाची प्रत्येक आठवड्याकरीता एक सभा आयोजीत करुन गावातील जनतेचे प्रश्न, अडचणी सोडविण्यात येतील. त्यामुळे पोलीस व जनता यामध्ये समन्वय, सुसंवाद प्रस्थापीत करता येईल.

त्या अनुषंगाने पालघर पोलीस ठाणेच्या वतीने गणेशोत्सव सणाच्या अनुषंगाने दि.०३/०९/२०२२ रोजी पालघर पोलीस ठाणे याठिकाणी सत्यनारायण पुजा व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमामध्ये उपस्थित पोलीस ठाणे हद्दीतील पालघर नगर परीषदेच्या नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवक तसेच प्रत्येक गावचे सरपंच, पोलीस पाटील, शांतता मोहल्ला कमिटी सदस्य, महिला दक्षता सदस्य, तंटामुक्त समिती अध्यक्ष, प्रतिष्ठीत नागरीक यांना जनसंवाद अभियान योजनेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सदर अभियान राबविण्याबाबतचा हेतू याबाबत श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर व पोनि/उमेश पाटील, प्रभारी अधिकारी पालघर पोलीस ठाणे यांनी उपस्थित सर्व नागरीकांना मार्गदर्शन केले.